दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.१ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १८५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 1 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 185 | Pages 4 | Rate 4 Rs


## गरज पडल्यास जागतिक संस्थांची मदत घ्या

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. अजितदादांच्या अपघाताबाबत जनसामान्यांच्या मनात असलेल्या सर्व शंकांचे निरसन झाले पाहिजे. गरज पडल्यास या तपासासाठी जागतिक स्तरावरील निष्णात संस्थांची मदत घ्यावी, पण सत्य लवकरात लवकर समोर आले पाहिजे, अशी मागणी तटकरे यांनी केली आहे.सुनील तटकरे म्हणाले की, विमान अपघाताचा तपास करताना कोणत्याही प्रकारची त्रुटी राहता कामा नये. आजवर या प्रकरणावर जे प्रश्न उपस्थित केले गेले आहेत, त्या सर्व बाबींचा सखोल तपास व्हावा. भारत सरकारच्या स्वायत्त संस्था आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयामार्फत चौकशी सुरू आहेच, शिवाय मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच सीआयडी (उखऊ) चौकशीचे आदेश दिले आहेत.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात उत्साहपूर्ण कार्यक्रम

# जावे विनोदाच्या गावा विशेष सादरीकरण लोकसेवेचा लोकजागरग्रंथाचे प्रकाशन

## मराठीला ज्ञानभाषा म्हणून पुढे नेण्याचे आवाहन; मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

### विनोद व अस्मिता यांचा संघर्ष होऊ नये, मराठीला ज्ञानभाषा बनवू-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा होणारा मराठी भाषा गौरव दिन विधान भवनात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाला. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे आयोजित जावे विनोदाच्या गावाया विशेष कार्यक्रमात अभिजात मराठी साहित्यातील विनोदी साहित्याचे अभिवाचन, संवाद आणि सांस्कृतिक सादरीकरण झाले. याचवेळी वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे संपादित लोकसेवेचा लोकजागर या ग्रंथाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते झाले.कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, विधिमंडळ मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे आदी मान्यवर उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून पुढे यायला हवी. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रमाण भाषेचे महत्त्व शिकवले, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिजात दर्जा देऊन राजाश्रय दिला. भाषेचा गोडवा टिकवायला हवा आणि तिचे साहित्य लोकांपर्यंत पोहोचवायला हवे. लोककला आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मराठी जिवंत ठेवायला हवी.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले, मराठीला हजारो वर्षांची परंपरा आहे. आचार्य अत्रे आणि पू. ल. देशपांडे हे विनोदाचे दोन शिखर आहेत. खान्देशी, कोंकणी, अहिरणी या सर्व मराठीच्या बहिणी आहेत. अभिजात दर्जा टिकवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. तंत्रज्ञानाच्या काळातही माय मराठीचे वैभव वाढवण्यासाठी एकत्र प्रयत्न करूया.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी राज्य शासनाच्या विविध उपक्रमांचा उल्लेख केला. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वागतपर भाषणात राजकारणात विनोदाच्या मर्यादांचा मिश्किल उल्लेख केला. तसेच याच विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मराठी भाषा सर्व शाळांमध्ये अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी देखील व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, मंत्री उदय सामंत यांसह राज्यातील अनेक खासदारांनी सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठपुरावा केला आणि पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. याबद्दल डॉ. गोऱ्हे यांनी आभार मानले व मराठीसाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तंत्रज्ञान युगातही मराठी शिक्षण आणि जतनाची जबाबदारी अधोरेखित केली.कार्यक्रमाची सुरुवात 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या गीताने झाली. पू. ल. देशपांडेंच्या 'माझा शत्रूपक्ष' चे ऋषिकेश जोशी यांनी, जयवंत दळवींच्या 'जगी हा खास वेड्यांचा पसारा' चे केदार शिंदे यांनी अभिवाचन केले. विंदा करंदीकर यांच्या निवडक कवितांचे वाचनही झाले. आचार्य अत्रे व पु. ल. देशपांडे : विनोदाची दोन शिखरे या विषयावर मिलिंद जोशी यांनी संवाद साधला. लोकगीतांचे सादरीकरणही झाले.कार्यक्रमाची संकल्पना उत्तरा मोने यांची होती, तर सूत्रसंचालन धनश्री दामले यांनी केले.हा कार्यक्रम मराठी उजागर करणारा ठरला असून, उपस्थित मान्यवरांनी मराठीच्या संवर्धनासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

## महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात भाषाभिमानाचा जल्लोष

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

नवविकास मंडळ माजलगाव संचलित महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. सुधीर देशमुख सर होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री. ओ. एम. दायमा यांची उपस्थिती लाभली. यावेळी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जे. पी. कुलकर्णी, ज्येष्ठ शिक्षक श्री. एस. के. गायकवाड, संस्था सदस्य तथा मराठी विषय शिक्षक श्री. हिमांशु देशमुख व श्रीमती अर्चना भाले यांची उपस्थिती होती.कार्यक्रमानिमित्त मराठी भाषेची महती अधोरेखित करणारे फलकलेखन साकारण्यात आले. सुरेश भट यांच्या ओळींनी कार्यक्रमात काव्यमय रंग भरला. तसेच कुसुमाग्रज स्वप्निल थोरात व पु. ल. देशपांडे चि.प्रसेनजित साळवे ९ वी अ या विद्यार्थ्यांनी




प्रतिमा फलकावर साकारून सर्व विद्यार्थ्यांनी अभिवादन केले. मराठी विषयाच्या वैविध्यपूर्ण भित्तीपत्रिका, चिकट बुक, वृत्तांतलेखन यांद्वारे विद्यार्थ्यांनी भाषाप्रेम व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक कु. भाग्यश्री शिंदे हिने केले. चि. चैतन्य तौर व कृष्णा पाईकराव यांनी मनोगत व्यक्त केले. गीत मंचातील प्रणिता गावडे, अनन्या भाग्यवंत, श्रुती राऊत व पूनम लांबूड यांनी सुमधुर गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. प्रमुख अतिथी श्री. ओ. एम. दायमा सर यांनी मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात श्री. सुधीर देशमुख सरांनी विद्यार्थ्यांना मातृभाषेचा अभिमान बाळगून तिचा प्रसार करावा, असे मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मोताळे समृद्धी व कु. चव्हाण समीक्षा यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. गायत्री काटे हिने केले. कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन श्रीमती अर्चना भाले यांनी केले होते. कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये राज्य भाषा गौरव दिन उत्साहात साजरा




दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**


देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे शुक्रवार, दिनांक २७ रोजी राज्यभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत ग्रंथ दिंडी काढून मराठी भाषेचा जागर केला. विद्यार्थ्यांनी विविध साहित्यिकांचे फोटो, घोषवाक्ये आणि मराठी भाषेचा गौरव करणारे फलक हातात घेऊन शाळा परिसरात उत्साहपूर्ण फेरी काढली. जय मराठी, माझी भाषा – माझा अभिमान अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि साहित्य वारसा याविषयी मनोगते व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांच्या कवितांचे प्रभावी वाचन करून उपस्थितांची मने जिंकली.प्राचार्या उमा जगतकर यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेचे महत्त्व, तिची परंपरा व साहित्य वारसा यावर प्रकाश टाकला. मराठी ही आपल्या संस्कृतीचे प्रतीक असून विद्यार्थ्यांनी तिचा अभिमानाने वापर करून तिचा गौरव वाढवावा, असे त्यांनी आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योस्ताना राठोड तसेच शर्मिला मुंडे यांनी केले. आभार प्रदर्शन सहशिक्षिका ऋतुजा उगले यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरद शिवप्रसाद तोष्णीवाल अबॅकस परीक्षेत देशात आठवा

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

किल्ले धारूर येथील आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस चे नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशन दि.२७ फेब्रुवारी रोजी पुणे येथे संपन्न झाली त्यात किल्ले धारूर शहरातील नामांकित असणाऱ्या आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस चा विद्यार्थी वरद शिवप्रसाद तोषणीवाल या विद्यार्थ्याने देशपातळीवरील स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवत आठवा आला आहे त्याबद्दल आरूष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस किल्ले धारूर चे संचालक प्रा.अविनाश जगताप व संचालिका शीतल जगताप यांच्या




सह पालक व धारूर येथील शिक्षणप्रेमी नागरिकांनी वरद तोष्णिवालच्या यशाबद्दल अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## विचारविश्वाचा सन्मान : डॉ.दत्ता विघावे यांचा डि.लिट पदवीने गौरव

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

बालाघाट (मध्यप्रदेश) येथे भारत सरकारचा अधिकृत उपक्रम असलेल्या इतिहास एवं पुरातत्व संग्रहालय यांच्या वतीने क्रिकेट क्षेत्रातील अद्वितीय, सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण योगदानाबद्दल डॉ. दत्ता विघावे यांना डि.लिट (डॉक्टरेट इन लिट्रेचर) या मानद पदवीने गौरविण्यात आले. मराठी क्रीडा-साहित्य आणि क्रिकेट समीक्षणाच्या इतिहासात हा क्षण अभिमानास्पद ठरला आहे.

क्रिकेट समिक्षक, प्रशिक्षक आणि पंच म्हणून ओळख असलेल्या डॉ. विघावे यांनी क्रिकेटकडे केवळ मनोरंजनाचा खेळ म्हणून न पाहता, तो विचार, शिस्त, मानसिकता, समाजभान आणि व्यवस्थापन यांचा संगम असल्याचे आपल्या लेखनातून अधोरेखित केले. पुरुष आणि महिला आंतरराष्ट्रीय सामने, कसोटी क्रिकेट, मर्यादित षटकांचे सामने, आयपीएल स्पर्धा, खेळाडूंची मानसिक तयारी, संघनिवड, नेतृत्व, तसेच क्रिकेट प्रशासनातील निर्णयप्रक्रिया या सर्व विषयांवर त्यांनी परखड, समतोल आणि अभ्यासपूर्ण भाष्य केले आहे. जगातील नामवंत क्रिकेट समीक्षकांमध्ये त्यांची गणना होते.

अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित डॉ. दत्ता विघावे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे आकडेवारी आणि वास्तव यांचा सुयोग्य मेळ. त्यांनी खेळाच्या आकड्यांच्या पलीकडे जाऊन खेळाडूंच्या मनोवृत्तीचा, संघाच्या धोरणांचा आणि परिस्थितीनुसार बदलणाऱ्या रणनितींचा सखोल अभ्यास केला. त्यामुळे त्यांचे लेख केवळ क्रिकेटप्रेमींसाठीच नव्हे, तर नवोदित खेळाडू, प्रशिक्षक, अभ्यासक आणि क्रीडा पत्रकारांसाठीही मार्गदर्शक ठरले आहेत.

मराठी भाषेतून क्रिकेट समीक्षणाला वैचारिक खोली आणि बौद्धिक प्रतिष्ठा देण्याचे श्रेय डॉ. विघावे यांना जाते. इंग्रजी भाषेच्या प्रभावाखाली असलेल्या क्रीडा विश्लेषणात त्यांनी मराठी भाषेचा आत्मविश्वास आणि प्रांजळपणा उंचावला. त्यांच्या लेखनातून



भाषेची शुद्धता, विचारांची स्पष्टता आणि मांडणीतील प्रामाणिकपणा ठळकपणे जाणवतो. त्यामुळे मराठी वाचकवर्गात क्रिकेटविषयी गंभीर, चिकित्सक आणि वैचारिक चर्चा निर्माण झाली.क्रिकेटपुरतेच नव्हे, तर समाजाशी असलेली त्यांची बांधिलकीही विशेष उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागातील वाचकांपर्यंत क्रिकेटविषयक ज्ञान पोहोचवणे, ग्रामीण युवकांना खेळासाठी प्रेरित करणे, आणि क्रीडा-संस्कृती रुजवण्यासाठी लेखन आणि मार्गदर्शनाद्वारे जनजागृती करणे हे त्यांचे ध्येय राहिले आहे. क्रिकेट हे केवळ स्पर्धेचे नव्हे, तर व्यक्तिमत्त्व घडविण्याचे साधन कसे ठरू शकते, हे त्यांनी आपल्या लेखनातून स्पष्ट केले.डि.लिट पदवी हा केवळ एक सन्मान नाही, तर चार दशकांच्या लेखनसाधनेची, वैचारिक प्रगल्भतेची आणि समाजाभिमुख दृष्टिकोनाची अधिकृत दखल आहे. हा गौरव केवळ एका व्यक्तीचा नसून, मराठी क्रीडा-साहित्य, क्रिकेट समीक्षण आणि अभ्यासपूर्ण पत्रकारिता या परंपरेचा सन्मान आहे.बालाघाट येथे झालेल्या या सन्मान सोहळ्याने मराठी क्रिकेट विचारविश्वाला नवी ऊर्जा दिली आहे. डॉ. दत्ता विघावे यांचे योगदान हे भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, त्यांच्या लेखनातून आणि विचारातून क्रिकेटकडे पाहण्याची दृष्टी अधिक समृद्ध झाली आहे. त्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल साहित्य, पत्रकारिता आणि क्रीडा क्षेत्रातून सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# संपादकीय

## आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.

मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे.शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी यंदा ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला असून, अर्थसंकल्पातील एकूण तरतुदींपैकी सुमारे ६० टक्के वाटा (४८ हजार १६४.२८ कोटी रुपये) भांडवली खर्चासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ५ हजार ५२० कोटी रुपयांची तरतूद आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेत प्रशासक म्हणून कारभार सुरू असताना मुदत ठेवी ९२ हजार कोटी रुपयांवरून ८१ हजार कोटींवर घसरल्या आहेत, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला गेला. त्यात तथ्य नाही हे अर्थसंकल्पातून दाखवून देण्यात आले. गेल्या तीन-चार वर्षांत रस्ते कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सुशोभीकरणावरही कोट्यवधींचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील खड्ड्यांचे प्रमाण कमी झाले याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे. मात्र, मुंबई शहरात बेस्ट, मेट्रो, एमएमआरडीए या स्वायत्त संस्थाच्या माध्यमातून रस्त्यावर एकाचवेळी कामे सुरू असल्याने, वाहतुकीच्या कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील वर्षी या सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्च २ लाख ३३ हजार कोटी रुपये एवढा होता. त्यामुळे एका वर्षात ११ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेचा महसुली वाढीसाठी सन २०१७ पासून बंद झालेल्या करमणूक शुल्काची आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच विकासकामाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका ग्रीन बाँड्स काढण्याची कार्यवाही करणार आहे. मुंबई शहरात रेल्वे स्थानके, रुग्णालये, शाळा आणि अरुंद पदपथांजवळच्या परिसरात फेरीवाल्यांचे बस्तान बसलेले जागोजागी दिसते. महापालिकेने फेरीवाल्यांचा त्रास कमी करण्यासाठी आणि अधिकृत विक्रेत्यांची ओळख पटवण्यासाठी अर्थसंकल्पात क्यूआर कोड आधारित प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली, त्याचे स्वागत करायला हवे. मुंबईत सुमारे १ लाख फेरीवाले असले तरी सर्वेक्षणात केवळ १५ हजार फेरीवाले पात्र आढळले आहेत. आता या पात्र फेरीवाल्यांनाच आता क्यूआर कोड असलेले डिजिटल प्रमाणपत्र दिले जाणार असल्याने अधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले ओळखणे सोपे होणार आहे. प्रशासनाकडून यापुढे अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई झाल्यास मुंबईकरांना रस्त्यांवरून चालताना मोकळा श्वास घेता येईल.

# सातपुड्याच्या कुशीत घुमतोय ढोलाचा नाद; बोरदच्या ऐतिहासिक 'भोंगऱ्या' बाजाराचा आज पासून श्रीगणेशा!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

काळूमोडू करीने आवजो मारा बोरदना भोंगऱ्या बाजार मे... या पारंपरिक गाण्यांचे स्वर आता सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यांत घुमू लागले आहेत. आदिवासी संस्कृतीचा मानबिंदू आणि तळोदा तालुक्यातील अस्मितेचे प्रतीक असलेला 'बोरदचा भोंगऱ्या बाजार' आज १ मार्चपासून मोठ्या उत्साहात सुरू होत आहे. निसर्गाच्या सानिध्यात आणि संस्कृतीच्या रंगात न्हाऊन निघालेल्या या उत्सवासाठी अवघा आदिवासी बांधव आता सज्ज झाला आहे.महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेश अशा तीन राज्यांच्या सीमेवर वसलेले १३ हजार लोकसंख्येचे बोरद गाव उद्या एका विशाल जत्रेचे स्वरूप धारण करेल. ३६ खेडे आणि पाड्यांमधील हजारो आदिवासी बांधव जेव्हा आपल्या पारंपरिक पेहरावात-डोक्यावर फेटा, अंगात बंडी आणि हातात ढोल घेऊन-रिंगण धरतील, तेव्हा तो सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा असेल.

'सातपुड्याच्या मातीचा सुटलाय गंध,
भोंगऱ्याच्या उत्सवात जीव झाला धुंद...
ढोलाच्या तालावर पडती पाऊलं,
संस्कृतीच्या जतनाचं पडलंय पाऊल!'



या उत्सवाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे २ मार्च रोजी (फाल्गुन पौर्णिमा) होणारे मुख्य होळी दहन. बोरदच्या या परंपरेत विज्ञानाच्या युगातही श्रद्धेचा ओलावा कायम आहे. सायंकाळी ६ वाजता गावातील मुखियांच्या हस्ते होळी पेटवली जाईल. विशेष म्हणजे, जोपर्यंत होळी मातेचे दर्शन आणि पूजन होत नाही, तोपर्यंत परिसरातील घराघरांत अन्नाचा कणही ग्रहण केले जात नाही. ही कडक निष्ठा आजही या मातीने जपून ठेवली आहे. भोंगऱ्या बाजार केवळ मनोरंजनाचे साधन नसून तो आर्थिक कणाही आहे. पानटपरीपासून ते मोठ्या दुकानांपर्यंत सर्वत्र कोट्यवधींच्या उलाढालीचे संकेत मिळत आहेत. रोजगारासाठी स्थलांतरित झालेले तरुण आणि सासरी गेलेल्या लेकी-सुना या सणासाठी आपल्या मातीकडे परतल्याने गावागावांत आनंदाचे उधाण आले आहे.  लाखो नागरिकांची मांदियाळी लक्षात घेता प्रशासनानेही कंबर कसली आहे: ग्रामपंचायतीने ८ दिवस आधीच गाव चकाचक करून स्वच्छतेवर भर. आरोग्य विभागाकडून रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक २४ तास तैनात ठेवण्यात येणार आहे.  अखंड वीजपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाकडून अनुचित प्रकार टाळण्यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. थोडक्यात सांगायचे तर,बोरदचा भोंगऱ्या बाजार हा केवळ एक उत्सव नसून तो आदिवासी बांधवांच्या एकतेचा आणि अस्मितेचा महाकुंभ आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या या सोहळ्याने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले असून, सातपुडा आता ढोल-ताशांच्या गजरात नाचण्यासाठी सज्ज झाला आहे!

# नंदुरबार जिल्हा परिषदेचा 'रणसंग्राम'! क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा मशाल प्रज्वलनाने दिमाखदार शुभारंभ

## प्रशासकीय कामाच्या फाईली बाजूला; आता मैदानात रंगणार चुरस!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

प्रशासकीय कामाचा ताण आणि फाईलींच्या गराड्यातून बाहेर पडत, नंदुरबार जिल्हा परिषदेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आता खेळाचे मैदान आणि सांस्कृतिक व्यासपीठ गाजवण्यासाठी कंबर कसली आहे. जिल्हा परिषद नंदुरबार आयोजित 'सांस्कृतिक कला व क्रीडा महोत्सव २०२६' चा मंगळवारी अत्यंत उत्साही आणि चैतन्यमय वातावरणात प्रारंभ झाला. जिल्ह्याच्या प्रशासकीय नेतृत्वाच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण नंदुरबार शहरात एक वेगळीच ऊर्जा निर्माण केली आहे.

**मशाल पेटली, खेळाडूंचा जोश वाढला!**

महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी मैदानावर उपस्थित असलेल्या शेकडो कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करत खेळाचा हा उत्सव साजरा केला. उद्घाटनानंतर बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा महोत्सव केवळ विरंगुळा नसून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणारा एक महत्त्वाचा दुवा आहे.  कार्यक्रमाच्या सुरुवातीला नंदुरबार, शहादा, तळोदा, अक्कलकुवा, अक्राणी आणि नवापूर या सहाही पंचायत समित्यांच्या पथकांनी शिस्तबद्ध पथसंचलन सादर केले. या पथसंचलनातून स्थानिक आदिवासी संस्कृती आणि आधुनिक प्रशासकीय शिस्त यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला. विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली.  दिनांक २४ ते २६ फेब्रुवारी दरम्यान चालणाऱ्या या महोत्सवात क्रिकेट, व्हॉलीबॉल, खो-खो यांसारख्या मैदानी खेळांसोबतच गायन, नृत्य आणि अभिनय अशा सांस्कृतिक स्पर्धांची मेजवानी असणार आहे. या स्पर्धांमुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधील 'प्रोफेशनल' भिंती गळून पडणार असून, त्यांच्यात 'टीम स्पिरिट' आणि 'आनंदी कार्यसंस्कृती' रुजण्यास मदत होणार आहे.या दिमाखदार सोहळ्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, गणेश मोरे, उदय कुसूरकर, हरीभाऊ हाके यांच्यासह जिल्ह्यातील ज्येष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे ते मैदानावर रंगणाऱ्या अटीतटीच्या सामन्यांकडे आणि अंतिम पारितोषिक कोण पटकावणार याकडे!



> हा महोत्सव म्हणजे प्रशासनातील एकात्मतेचा उत्सव आहे. कामाच्या दगदगीतून मोकळा श्वास घेतानाच, सहकाऱ्यांमधील संवाद वाढवण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत महत्त्वाचे आहे.
> - नमन गोयल (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नंदुरबार)

# दुर्गम भागातील विकासाचा वनवास संपवणार; खासदार गोवाल पाडवी यांचा अक्कलकुवा तालुक्यातील गमण येथे निर्धार

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार लोकसभा मतदारसंघातील अतिदुर्गम भागात आजही सरकारी योजना आणि मूलभूत सोयी-सुविधांची वानवा आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, हा अनुशेष भरून काढण्यासाठी आपण कटिबद्ध असून, गमणसारख्या दुर्गम गावांतील प्रत्येक घरापर्यंत रस्ता, वीज, पाणी आणि दर्जेदार शिक्षण-आरोग्य सुविधा पोहोचवणे हीच आपली प्राथमिकता असल्याचे प्रतिपादन खासदार गोवाल पाडवी यांनी केले.

अक्कलकुवा तालुक्यातील गमण येथे स्थानिक नागरिकांनी आयोजित केलेल्या विशेष सभेला खासदार पाडवी यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी गावकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेतल्या आणि त्यांच्याशी संवाद साधला.या सभेदरम्यान दुर्गम भागातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक गंभीर अडचणी खासदारांसमोर मांडल्या. यामध्ये प्रामुख्याने गावात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमधील तांत्रिक अडचणी आणि प्रलंबित कामांमुळे नागरिकांना होणारा त्रास.अखंडित वीजपुरवठ्याचा अभाव आणि वीज वितरण कंपनीच्या कारभाराबाबत असलेल्या तक्रारी.

दुर्गम भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण आणि शाळांमध्ये अपुऱ्या असलेल्या शैक्षणिक सुविधा.भौगोलिक दुर्गमता आणि प्रशासकीय दुर्लक्षामुळे रखडलेले इतर विकास प्रकल्प.गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर खासदार गोवाल पाडवी म्हणाले की, माझ्या मतदारसंघातील अशा दुर्गम भागांपर्यंत अपेक्षित प्रमाणात सरकारी संसाधने पोहोचलेली नाहीत, ही खेदाची बाब आहे. परंतु, आता परिस्थितीत बदल घडवून आणण्याची वेळ आली आहे. सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने पाठपुरावा करून या कामांना गती देण्यात येईल.  केवळ आश्वासने न देता, प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्याच्या खासदारांच्या या भूमिकेचे गमण परिसरातील नागरिकांनी स्वागत केले आहे. आपल्या विश्वासाला तडा जाऊ न देता, या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी माझे प्रयत्न अविरत सुरू राहतील, अशी खात्रीही त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिली.




# निसर्गपूर्जा/आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडणार,दांडा गुजरातच्या जंगलातून विधीवत पूजा करून आणण्यासाठी पुजारी रवाना

## काठीच्या राजावाडी होळीची तयारी पूर्णत्वाकडे

**मोलगी । रविंद्र वळवी**

शतकोत्तर परंपरा असलेली व संपुर्ण देशभरात प्रसिद्ध असलेल्या काठी येथील राजवाडी होळीचा (दांडा) बांबू घेण्यासाठी गांव पुजारी व होळीचे सेवेकरी गुजरात राज्यातील जंगलात पायी रवाना झाले आहेत.                 सातपुड्यातील काठी येथील राजवाडी होळी ही संपुर्ण देशात प्रसिद्ध असलेली होळी आहे.विविधांगी वैशिष्ट्यांनी नटलेल्या होळीचे आकर्षण अबाल वृद्धां पासुन सर्वांनाच आहे. काठी येथील राजवडी होळीसाठी लागणारा बांबूचा दांडा आणण्याची शतकोत्तर परंपरा आहे. हा दांडा गुजरात राज्यातील जंगलातुन पायपीट करीत आणला जातो. हा दांडा आणण्याची पद्धत वंश परंपरागत आहे. सुरुवाती पासुन हा दांडा काही निवडक कुटुंबातील लोकं हे वंश परंपरागत पद्धतीने आणत आहेत. गाव आणि समाज रूढी परंपरा यांचे जतन करत आहेत. ह्या होळीसाठी काठी गाव पुजारी म्हणून गोमऱ्या टेंबऱ्या वसावे, रायसिंग हांद्या वसावे, सतिराम भामटा वसावे ह्यांच्याकडे धुरा आहे.  राजवाडी होळीचा बांबू घेऊन येणारे मानकरी रायसिंग हांद्या वसावे,सेमट्या टेड्या वसावे, मांग देहल्या राऊत, बाहद्या किर्ता वसावे, नोवजा इरमा वसावे, रामा बाहद्या पाडवी, रविंद्र पेचरा वसावे हे होत.  होळी सजावट करणारे बापा राऊत, जोतन्या वसावे तेजला राऊत, दोहऱ्या वसावे, गोप्या वसावे, सांगा राऊत, हे आहेत.  यंदाच्या होळीचा दांडा घेण्यासाठी मानकरी हे दि.२७ फेब्रुवारी रोजी सकाळी काठी येथुन रवाना झाले आहेत. होळीचा दांडा आणणारे मानकरी हे पायपीट करुन लगतच्या गुजरात राज्यातील जंगलात जाऊन होळीचा दांडा होळीच्या दिवशी मध्यरात्री काठी येथे आणतील. जंगलात जाऊन परंपरे नुसार लागणारा होळीच्या दांड्याची निवड करुन कोणत्याही हत्यारांचा वापर न करता केवळ लाकडी साहीत्याने बांबुला मुळा सकट काढले जाते. होळीचा बांबू नामगिर, हाकडी ता.डेडियापाडा जि.नर्मदा या गावातील जंगलातुन आणला जातो. मुळासकट काढुन आणलेल्या या होळीच्या दांड्याला पायपीट करीत आणले जाते.रस्त्यात लागणाऱ्या प्रत्येक गावात भाविक या दांड्याची मनोभावे पुजा करुन मार्गस्थ करीत असतात.



# माजी आमदार डॉ.अवीनाश वारजूकर बंधू,फुलात फुलले;चिमूर विधानसभा राजकीय भूकंप

## आमदार भांगडिया साहेब यांच्या चाणयक बुद्धीच्या चक्रव्यूह मध्ये कांग्रेसचे मोठे नेते चारेखाणे चित्त

# चिमूर विधानसभा मध्ये कांग्रेस पार्टीचे मोठे दबंग नेते ज्याच्या नावाने चिमुरात कांग्रेस पार्टीच अस्तित्व टिकून होते मात्र आता तेच नेते भाजपा पार्टी मध्ये पक्ष प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार उर्फ बंटी भांगडिया यांच्या पुढाकारातंर्गत काँग्रेस पक्षाचे माजी आमदार डॉ.अविनाश वारजूरकर,चंद्रपूर जिल्हा परिषद माजी अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे महासचिव डॉ.सतीश वारजूरकर,युथ काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश महासचिव व शंकरपूर ग्रामपंचायतीचे सरपंच शाईश सतीश वारजूरकर तसेच पलाश अविनाश वारजूरकर यांनी अधिकृतपणे भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.

प्रदेशाध्यक्ष श्री.रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते हा पक्षप्रवेश सोहळा मुंबईतील पक्ष कार्यालयात संपन्न झाला.भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री.रवींद्र चव्हाण यांनी पक्ष प्रवेशानंतर वारजूरकर कुटुंबियांचे भारतीय जनता पक्षात मनःपूर्वक स्वागत केले आणि त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मात्र,वारजूकर बंधूंनी भाजपात प्रवेश करण्याचे खरे गुढ काय? हे अजूनही गुलदस्त्यात आहे.पुढारी स्वत:च्या सोयी नुसार पक्ष बदलवतात.राजकीय,आर्थीक व सामाजिक क्षेत्रात स्वत:ला जैसे थे ठेवण्यासाठी धडपडतात.स्वत:च्या अस्तित्वाला कायम राखण्यासाठी राजकीय गणिते सोडवत राहतात,हे लपून नाही.

माजी आमदार डॉ.अवीनाश वारजूकर,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ.सतीष वारजूकर,सरपंच साईश सतीष वारजूकर,पलाश अवीनाश वारजूकर हे भाजपात कसे फुलतात,हे येणारा काळच ठरवेल

यावेळी माजी आमदार डॉ.नामदेव उसेंडी,जिल्हा बँक संचालक आवेश खान पठाण,संचालक गणेश तर्वेकर,विलास ईकार आणि सचिन आकुलवार यांचीही उपस्थिती होती.



# शेळगाव गौरी येथे मोफत आरोग्य शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य विमा योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत नायगाव तालुक्यातील शेळगाव गौरी येथे आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य शिबिर मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराचि सूरूवात राजे छत्रपती शिवाजि महाराज यांच्या प्रतिमेचे पुंजन करून सूरूवात झालि या शिबिरामध्ये तब्बल ११५ नागरिक, माता बंघिनि व जिल्हा परिषदेच्या शाळेतिल ४७ विद्यार्थाचे रक्त गट व मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.




या शिबिरामध्ये हृदयरोग, किडनी विकार, मधुमेह, कर्करोग, थायरॉईड, रक्तदाब तसेच इतर गंभीर आजारांबाबत तपासणी, उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेअंतर्गत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत माहिती देण्यात आली. नांदेड येथील तूकाईमाई खाजगी रुग्णालयाचे प्रमुख डॉ. दत्तात्र्य काळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित होती. यामध्ये डॉ. डॉ. संदिप तूमोड, डॉ. कृष्णा देशमुख, डॉ. मगेश काळे, गौरव आरसुळे, आदित्य गोरे, विद्या सुगावे, बालाजि पा. शेळगावकर, सुनिल पाटिल, मुकुंद गडगिळे, अभिजित सगर्यशि यांचा सहभाग होता. डॉक्टरांनी रुग्णांची सखोल तपासणी करून आवश्यक उपचार व पुढील मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये जेष्ठ नागरिकासाठि व महिलासाठि मोफत एउत्र्ह, महिलासाठि मोफत हिमोग्लोबिनची तपासणी, जेष्ठमडळिसाठि विशेष रक्तातील साखरेचे प्रमान व ईतर आजाराचि तपासनि करन्यात आलि विशेष म्हनजे जिल्हा परिषदेचे मुख्याध्यपक जयप्रकाश ईगळे सर, व एम.एम. बांड मॅडम व शाळेतिल ४७ विद्यार्थाचे मोफत रक्तगट तपासनि करून त्यांना जागेवरच रक्तगट कार्डचे वाटप करन्यात आले. हा कार्यक्रम छत्रपति राजर्षी शाहु मगल कार्यालय शेळगाव गौरी येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे आयोजक अवकाश पाटिल धुप्पेकर यांच्या वतीने तूकामाई हॉस्पिटलच्या डॉक्टरांच्या टीमचे स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविकात अवकाश पाटील धुप्पेकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानत अशाच प्रकारचे मोफत आरोग्य शिबिर भविष्यातही राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. या शिबिरामध्ये ऊपस्थित जेष्ठ प्रतिष्ठित पंडितराव पाटिल, नागोराव पाटिल, मनोहर पो. पाटिल, सुधाकर पाटिल, साहेबराव पाटिल, सतोष देशाई, प्रमुख ऊपस्थित होते. व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय ठरली.

एकूणच हे मोफत आरोग्य शिबिर सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरले असून ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरले, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थानाची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

नांदेड जिल्हातील सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, ग्रामसेवक जिल्हातील कर्मचाऱ्यांसाठी शासनातर्फे निवासांची व्यवस्था करावी अशी मागणी.कंधार तालुक्यातील गटविकास अधिकारी तहसीलदार ,तलाठी ,ग्रामसेवक हे कर्मचारी सज्जाच्या ठिकाणी राहत नाहीत व खेड्यामध्ये निवासाची व्यवस्था होत नसल्यामुळे ती शहरांमध्ये म्हणजेच जिल्ह्याच्या ठिकाणी तालुक्याच्या ठिकाणी त्यांच्या सोयीनुसार राहतात शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक शेतावर किंवा गावात येऊन कृषी सल्ला व तलाठी व ग्रामसेवक ते सुद्धा मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यास राहत नाहीत या सर्व बाबीमुळे गोरगरीब जनतेस वेळोवेळी अधिकाऱ्यांना कुठे आहात केव्हा येणार आहात केव्हा भेटता असेल विचारावे लागत आहे तरी वरील सर्व बाबी लक्षात घेऊन प्रत्येक सज्जाच्या ठिकाणी शासनातर्फे निवासांचे बांधकाम करावे अशी मागणी जिल्हाधिकारी नांदेड व कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राष्ट्रीय संविधान बचाव अभियान नांदेड जिल्हा महासचिव व्यंकटी जाधव व पांडुरंग कंधारे यांच्या सहआदींनी केली आहे



**लोहा नगरपालिका वार्ड क्रमांक एक मध्ये नालीची स्वच्छता करून घेताना नगरसेवक मारुती भाऊ जंगले व पत्रकार राजाराम फाजगे स्वच्छतेची पाहणी करताना**

# देगलूर मध्ये रेतीचे वाहतूक करणारे टिप्पर ओव्हरलोड मध्ये प्रशासन मात्र झोपेत

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

रेतीचे वाहतूक अतिशय मोठ्या प्रमाणात होतांना दिसत असून .मोठ्या प्रमाणात नियम बाह्य वाहतूक होत आहे. रेती वाहतूक करणाऱ्या टिप्पर हा अति लोड घेऊन नियम बाजूला ठेवून रेती वाहतूक करतांना दिसतआहे. प्रशासन मात्र याकडे दूर्लक्ष करून चुकीचा व्यवहाराला पाठिबा तर देत नाही का? अशी शंका निर्माण होत आहे .

घरकूल धारकांना रेती मिळत नाही पण काही दलाल मार्फत रेतीचे मोठ्याने प्रमाणात उत्खनन होतांना दिसत आहे. अणि ओव्हरलोड टिप्परांची खूप मोठ्या प्रमाणात रोडवरती वाहतूक होतांना संबंधीत अधिकारी मात्र कोणतेही कार्यवाही करतांना आढळून येत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात यात भ्रष्ट्राचार आणि ओव्हरलोड मूळे रोडवरती खूप मोठ्या प्रमाणात खड्डे पडतांना दिसत आहे . आता गौणखनिज विभागाचे अधिकारी कोणतेही ॲक्शन किंवा कार्यवाही करतांना दिसत नाही त्यामुळे यांचे पण या रेती तस्करी मध्ये योगदान आहे. का? ही शंका निर्माण होत आहे.




पोलिस प्रशासन तसेच तहसिल कार्यालय व ठढज हे फक्त सर्वसामान्य जनतेला च पकडण्यासाठी आहेत का? अशी चर्चा आता जनतेत उमट आहे .

तरी प्रशासन या कडे लक्ष देऊन जे नियम बाह्य वाहतूक होत आहे त्यांच्या वर कठोर कार्यवाही करणार का? हा मुख्य प्रश्न उपस्थित होत आहे. गोरगरीब जनतेला घरकूल बांधण्यासाठी शासनाची रेती खरंच मिळवण्यासा मिळवण्यासाठी वनवास भोगावा लागत आहे . रेती अभावी घरकूलांचे बांधकाम रकडले आहेत पण घरकूल धारकांना रेती मिळत नाही . फक्त घरकूल धारकांचे नावाने .रेती तस्करी करणांऱ्या दलालांचे मात्र दिवाळी साजरी होतांना आताची सत्य परिस्थिती आहे.प्रशासन जागृत होऊन योग्य कार्यवाही करणार का?

# छत्रपतींच्या पुतळ्यासमोरील जिर्णावस्थेत असलेला विद्युत खांब तात्काळ हटवा!

## मदनापूर वासियांसह वायफनीकर पाटील यांचे अधीक्षक अभियंता नांदेड यांना निवेदन!

दैनिक वादळ वार्ता
**माहूर । प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील मौजे मदनापूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आश्वारूढ पुतळ्यासमोरील जिर्णावस्थेत असलेला विद्युत खांब हटविण्यासाठी मदनापूर वासियांनी मागील पाच वर्षांपासून संबंधित कार्यालयाला वारंवार विनंती करूनही सदरील खांब हटवीण्याबाबत संबंधित तालुका विभागाने कुठलीही उपाययोजना केली नसल्याने काल दि.२७फेब्रुवारी रोजी पिंटू(लक्ष्मीकांत)पाटील वायफनीकर यांनी मराविम अधीक्षक अभियंता नांदेड यांना लेखी निवेदन देत जिर्णावस्थेत असलेला तो खांब तात्काळ हटवावा अशी मागणी केली आहे.



मागील पाच वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या जीर्णवस्थेतील खांबामुळे गाववासियांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे.शिवाय लागूनच महाराजांचा पुतळा असल्याने खांब कोसळून एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे तात्काळ तो खांब हटविणे गरजेचे असून जिर्णावस्थेतील खांब कोसळून विटंबना झाल्यास किंवा एखादी दुर्घटना झाल्यास संबंधित विभाग सर्वस्वी जबाबदार राहील असे निवेदनात नमूद केले आहे.

त्याबरोबरच मागील आठ दिवसांपासून वाई बाजारसह परिसरात वारंवार अवेळी भारनियमन होत असल्याने शेतकऱ्यांसह विजेशी संबंधित व्यवसायिकांना कामकाजात व्यत्यय निर्माण होत असून सध्या पवित्र रमजान महिना सुरु असून नियमित विजपुरवठा सुरु ठेवण्याबाबत संबंधित कार्यालयाला सूचना द्याव्यात अशी मागणी केली आहे.

# ग्राम महसूल अधिकारी सज्जावर थांबेना कोट्यावधी चे सज्जे झाले मोकाट श्वानाचे निवास

## सज्जावर बायोमेट्रिक प्रणाली बसवून हजेरी घ्या प्रफुल जाधव यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**माहूर । प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी सज्जा कार्यालयात न राहता माहूर शहारात विविध ग्राम महसूल अधिकारी सज्जाची कार्यालये थाटून खासगी प्रतिनिधी मार्फत कामकाज करीत असल्याने लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाच्या इमारती ओस पडल्याने ग्राम महसूल अधिकारी यांना सज्जा कार्यालयात जातीने स्वतः थांबून नागरिकांची कामे करण्याचे आदेश देणे बाबत व सज्जावर बायोमेट्रिक प्रणाली बसवून हजेरी नोंद घ्यावी अशा आशयाचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते प्रफुल जाधव यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना सादर केले असून निवेदनाच्या प्रति, पालकमंत्री अतुल सावे, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. भीमराव केराम यांना सादर करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून माहूर तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी हे ग्राम महसूल अधिकारी सज्जा कार्यालयातून कामे न करता माहूर शहरातील सोनापीर बाबा दर्गाहकडे जाणाऱ्या रोड लगत विविध सज्जाचे महसूल अधिकारी कार्यालय थाटून बसले आहेत. तसेच प्रत्येक ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांचे कामकाज करण्यासाठी काही खासगी व्यक्ती रोजंदारीने ठेवलेली असून त्यांच्या मार्फत नागरिकांच्या छोट्या छोट्या किरकोळ कामासाठी अनधिकृतपणे पैसे उकळण्याचे काम राजरोस पणे केल्या जातात. जसे की वारस फेरफार करिता संबधित शेतकरी यांचे कडून रक्कमेची मागणी करण्यात येते. रक्कम देण्यास असमर्थता दर्शविली असता काहीतरी किरकोळ सबब काढून कामाची अडवणूक करण्यात येत असल्याचे अनेक शेतकरी सांगत असल्याचे नमूद केले आहे.

माहूर तालुक्यातील रेती घाटाचे लिलाव झाले असतांना पर्यावरण विभागाच्या परवानगी अभावी रेती घाट सुरु झालेले नाही. असे असतांना तालुक्यातील जवळपास सर्वच रेती घाटातून रेतीचे अवैध उत्खनन व अवैध वाहतूक राजरोसपणे होत आहे. त्यामुळे रेती तस्कर व संबधित सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी यांचे संगनमतातूनच रेती व गौण खनिजचे अवैध उत्खनन व अवैध वाहतूक होत असल्याच्या शंकेला पूर्ण वाव असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. रेती घाट ज्या सज्जा अंतर्गत आहेत त्या सज्जातील ग्राम महसूल अधिकारी सज्जाच्या कार्यालयात नागरिकांना कधीही भेटत नाहीत तसेच त्यांनी माहूर येथे थाटलेल्या खासगी कार्यालयात सुद्धा ते दिवसभरात एखादा तास हजर राहत असतात इतर वेळात त्यांचे रोजंदारीवर ठेवलेले खासगी नौकर हेच त्यांचे काम पाहतात अक्षरशा महत्वाच्या संवेदनशील बाबीत सुद्धा तेच पाहतात. तर ग्राम महसूल अधिकारी मात्र रेती तस्कराच्या मागावर राहून रेती तस्कराशी संगनमत करून रेती त्या बदल्यात माया जमा करण्याचे काम करत असून ग्राम महसूल अधिकाऱ्याचे मोबाईल ट्रॅक केल्यास या बाबीचा स्पष्ट उलगडा होऊ शकतो असेही नमूद करण्यात आले आहे.

या मुळे माहूर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांच्या कामाचा खोळंबा होत असल्याने याबाबत मी माहूर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार कैलास जेठे यांना विचारपूस केली असता याबाबत आम्ही ग्राम महसूल अधिकारी यांना ग्राम महसूल सज्जात राहून कामे करण्याबाबत वारंवार सूचना दिल्या परंतु ग्राम महसूल कर्मचारी आमचे ऐकत नाहीत असे अजब प्रकारचे उतर दिले असल्याचे प्रफुल जाधव यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले

# ‘आरव’ मध्ये महिलांच्या मनातील स्पंदने,भावविश्व-डॉ.मनोज वराडे

## ‘आश्लेषा प्रकाशन’तर्फे लेखिका नीलिमा भावे यांचा कथासंग्रह



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

चतुरस्त्र लेखिका नीलिमा भावे यांनी समाजाच्या विविध स्तरांतील महिलांच्या मनातील अंतरंगातील, पैलू आणि भावविश्व टिपून ऋआरव' कथासंग्रहात मांडली आहेत, असे प्रतिपादन लेखक डॉ. मनोज वराडे यांनी शनिवारी येथे केले. ऋआरव'मध्ये अनुभवांचे भावविश्व व भगवद्गगीतेचा दिलेला संदेश वाचकांना नक्कीच खिळवून ठेवेल, असा विश्वास डॉ. वराडे यांनी व्यक्त केला.मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून अशोक राजाराम तावडे यांच्या ऋआश्लेषा प्रकाशन'तर्फे प्रसिद्ध लेखिका नीलिमा भावे यांचा ऋआरव' कथासंग्रहाचे प्रकाशन डॉ. वराडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धनंजय व चंद्रकांत दिवाळी अंकाच्या संपादिका नीलिमा कुलकर्णी, लेखिका नीलिमा भावे, अशोक तावडे, मेजर डॉ. आश्लेषा तावडे-केळकर यांची उपस्थिती होती.

ऋआरव' कथासंग्रहातील प्रत्येक कथा ही एकेका वेगवेगळ्या स्त्रीची भूमिका व तिचे मन मांडणारी आहेत. लेखिका नीलिमा भावे यांचा अनुभव व ठिकठिकाणी फिरताना जाणवलेली संस्कृती, वैशिष्ट्ये आणि समाजमनाची स्पंदने कथासंग्रहात टिपली आहेत. ऋभिरभीर', ऋकौशी', ऋगोष्ट एका बागेची', ऋभानामती', ऋपाच पिढ्यांची गोष्ट' अशा कथासंग्रहातून त्या भागाची व समाजाचे भावविश्व उलगडले, अशा शब्दांत डॉ. वराडे यांनी कथासंग्रहाचा गौरव केला. तसेच प्रत्येक मराठी वाचकाने आरव कथासंग्रह आवर्जून वाचावा, असे आवाहन केले.संपादिका नीलिमा कुलकर्णी यांनी प्रकाशन व्यवसायानिमित्ताने केलेला प्रवास उलगडला. दिवाळी अंक व पुस्तकांची खिळेजुळणी, बुक बायडिंग ते संगणकापर्यंतची वाटचाल, प्रकाशन व्यवसायातील अडचणी, नवनवीन पुस्तकांसाठी शोधलेले विषय आदींची माहिती दिली. त्याचबरोबर ऋआरव' कथासंग्रहाचे कौतुक केले. लेखिका नीलिमा भावे यांनी मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, ऋऋमाझी तरुणपणीची नोकरी रिमांडमध्ये होती. तर विवाहानंतर पती ऋओएनजीसी'त कार्यरत असल्यामुळे अन्य राज्यात ठिकठिकाणी नोकरी असल्यामुळे देशाची विविधता व वैशिष्ट्ये पाहता आली. अनेक व्यक्ती, मुले, महिलांची भेट झाली. त्यावेळी मिळालेले अनुभव ऐकून ऋपरकाया प्रवेश' करीत कथासंग्रह साकारला, असे नीलिमा भावे म्हणाल्या.

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून ऋआरव' कथासंग्रह वाचकांना उपलब्ध करून देण्यात आनंद होत आहे, अशी भावना प्रकाशक अशोक राजाराम तावडे यांनी व्यक्ती केली. लेखिका नीलिमा भावे यांनी छोट्या छोट्या निरीक्षणातून कथेतील पात्रे साकारली आहेत. आरव कथासंग्रह हा नक्कीच वाचकांच्या अंतकरणाला भिडेल, अशी आशा अशोक तावडे यांनी व्यक्त केली.

## शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीरसिंह पंडित पुणे येथे विवाहबद्ध



दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी,** माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांचे नातू, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे चिरंजीव, जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांचे पुतणे, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीरसिंह पंडित, यांचा विवाह सोहळा (टाकळी बोबडे तालुका परभणी, हल्ली मुक्काम छत्रपती संभाजीनगर येथील) बाबाजीराव बोबडे यांची नात तथा संजय बोबडे यांची सुकन्या डॉ. सृष्टी हिजबरोबर गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी जे.डब्ल्यू. मॅरियट हॉटेल, पुणे येथे कौटुंबिकरित्या उत्साहात पार पडला. या विवाह सोहळ्यास पंडित व बोबडे परिवारातील सदस्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर आवर्जून उपस्थित होते. रणवीरसिंह पंडित यांचा विवाह सोहळा कौटुंबिक पद्धतीने पार पडला असला तरी त्यांच्या विवाहाप्रित्यर्थ रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजता जयभवानी मंदिर, शिवाजीनगर गढी, ता. गेवराई येथे भव्य स्वागत समारोह आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित, डॉ.बी.आर. पंडित, सुंदरराव पंडित, संभाजी अण्णा पंडित, सुरेशराव पंडित, पंजाबराव पंडित, शाहूराव पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, जयसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित, दैठणचे सरपंच प्रतापसिंह पंडित, गेवराई पंचायत समितीचे माजी सभापती अभयसिंह पंडित, युवानेते उदयसिंह पंडित, डॉ. अजयसिंह पंडित, इंद्रजीत पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासह पंडित परिवाराने केले आहे

## NMMS जिल्हा परिषद बेलकुंड;शाळेचे घवघवीत यश

## महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषेदेच्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत ११ विद्यार्थी उतीर्ण




दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्रशाला बेलकुंड शाळेतील विद्यार्थ्यांनी २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषेदेच्या वतीने घेण्यात आलेल्या NMMS राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती योजना परिक्षेत सहभाग नोंदवत ११ विद्यार्थिनीनी घवघवित यश संपादन केले आहे.जिल्हा परिषद बेलकुंड शाळेत सर्वसामान्य,कष्टकरी गोरगरिबांचे लेकर शिक्षण घेत असून प्रथमच इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेनार्या विद्यार्थ्यांना संजीव बिराजदार, श्रीमती हिरेमठ एस.पी,श्रीमती कासराळे एस एम. मस्के एच एस. तसेच या सर्व शिक्षिका व शिक्षकांनी NMMS परिक्षेस बसवून विद्यार्थ्याकडून Online व Ofline १० पेक्षा जास्त सराव परिक्षा घेत जादा तासिका घेवून संजीव बिराजदार, श्रीमती हिरेमठ एस.पी,श्रीमती कासराळे एस एम. मस्के एच एस मॅडम व सरांनी विद्यार्थ्याकडून कठोर परिश्रम करून घेत अभ्यासक्रम पुर्ण करून घेतला आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शना नुसार NMMS परिक्षेस बसलेल्या मुलाने ध्येयनिष्ठ चिकाटीने मेहनत करत घवघवित यश संपादन करत प्रशालेचे नाव लौकीक केले आहे.NMMS शिष्यवृत्ती परिक्षेतील गुणवंत विद्यार्थी.अनुष्का नितीन साळुंखे, अर्पिता दत्ता आगलावे, श्रेय लक्ष्मण जगताप पाटील, रणवीर राजकुमार तोळमारे, नेहा महादेव करसुळे, संजय प्रदीप कांबळे, अश्विनी बालाजी पवार, ज्ञानेश्वर अमोल आगलावे, दीक्षा महादेव साळुंखे, अक्षरा मेघराज कांबळे, संघर्ष कैलास कांबळे,या ११ विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणि समर्पनामुळे यश संपादित करत जिल्हा परिषद बेलकुंड शाळेचे नाव मोठ केले.परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांनी व मार्गदर्शक शिक्षिका व शिक्षक संजीव बिराजदार, श्रीमती हिरेमठ एस.पी,श्रीमती कासराळे एस एम. मस्के एच एस. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुख्याध्यापक एस जी शेख तसेच शिक्षक जी.जी दीक्षित, जी.एन मिटकरी,पी.पी खरोसे, एस.आर फावडे, ए.एस लेंडोळे, जी.एस मुंडेतसेच शिक्षिका एस.टी कुलकर्णी, एल.एस स्वामी, तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीयशस्वी विद्यार्थीनिंचे कौतूक करत अभिनंदन केले.

## घुग्घुसमध्ये LCB चा मोठा छापा;१ किलो ७१४ ग्रॅम गांजासह दोघांवर गुन्हा दाखल



दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस येथे २६ फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) गुप्त माहितीच्या आधारे धडक कारवाई करत गांजा विक्रीप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वतन लक्ष्मण ताटेपली व त्याची पत्नी वैष्णवी वतन ताटेपली (दोन्ही रा. विकास नगर, वॉर्ड क्र. ६, घुग्घुस) यांच्या राहत्या घरी छापा टाकण्यात आला. या कारवाईत १ किलो ७१४ ग्रॅम गांजा (अंदाजे किंमत १७ हजार रुपये) तसेच एक इलेक्ट्रॉनिक डिजिटल वजन काटा (कि.अं. ५०० रुपये) असा एकूण १७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी घुग्घुस पोलीस स्टेशन येथे संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे, तर वतन लक्ष्मण ताटेपली हा फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली LCB चे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा पथक व घुग्घुस पोलीस स्टेशनच्या संयुक्त कारवाईतून करण्यात आली.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपास सुरू आहे.

## हदगाव शहरात व तालुक्यात गुटखा विक्रीला ऊत,कॅन्सरला आमंत्रण

दैनिक वादळ वार्ता

**हदगांव । प्रतिनिधी**

राज्यात सुगंधित तंबाखू व गुटखा विक्रीवर बंदी असतानांही हदगाव शहरात व तालुक्यात उघडपणे गुटखा,व बंदी असलेल्या सुगंधित तंबाखूची विक्री सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.गल्लीबोळातील टपऱ्यावर राजरोसपणे सुगंधी तंबाखूची विक्री होत असून यामुळे कॅन्सर सारख्या जीव घेण्या आजाराचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र शासनाने कॅन्सरवर आळा घालण्यासाठी सुगंधित तंबाखू व गुटखा विक्रीवर कायदेशीर बंदी लागू केली आहे. मात्र हदगाव शहरात व तालुक्यात या बंदीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे आरोप नागरिकाकडून करण्यात येत आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाचे असताना सुद्धा तेज्ञयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. काही सगज नागरिकांच्या मते संबंधित विभागाने मूक संमती दिली असल्यानेच हा व्यवसाय खुलेआम फोफावत आहे परिणामी तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असून सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत चाललेला आहे. दरम्यान या प्रकरणी वरिष्ठ अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून कारवाई करावी अशी मागणी शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. गुटका व सुगंधी तंबाखूच्या विक्रीवर आळा बसतो का आणि प्रशासन ठोस पावले उचलते का याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चेंबूर मधील सुभाष नगर परिसरातील बांधकामाधीन इमारतीवरुन मजूर कोसळल्या प्रकरणी कठोर कारवाई करावी-महापौर श्रीमती रितू तावडे



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज चेंबूर येथील सुभाष नगर परिसरातील बांधकामाधीन असलेल्या इमारतीवरून सहा मजूर कोसळले. पैकी एकाचा मृत्यू झाला तर अन्य पाच जण जखमी झाले. आज (दिनांक २८ फेब्रुवारी २०२६) दुपारी घडलेल्या या दुर्घटना स्थळी महापौर श्रीमती रितू तावडे यांनी तातडीने भेट दिली. तसेच घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात जाऊन जखमी मजुरांची विचारपूस देखील त्यांनी केली. यावेळी उप महापौर श्री. संजय घाडी आणि विरोधी पक्षनेता श्रीमती किशोरी पेडणेकर हे उपस्थित होते. घटनास्थळी भेट दिल्यानंतर प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी बोलताना महापौर श्रीमती रितू तावडे म्हणाल्या की, सदर दुर्घटनेबाबत प्राथमिक माहिती घेतली आहे. त्यानुसार, आदित्य राज या विकासकामार्फत इमारत बांधकाम सुरू आहे. या इमारतीवरून सहा मजूर खाली कोसळले. पैकी एका मजुराचा दुर्दैवाने मृत्यू ओढवला आहे. तर अन्य पाच जणांवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मजूर नेमके कसे कोसळले, याची माहिती घेतली असता या बांधकाम स्थळी अतिशय निष्काळजीपणा करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे. अशा प्रकारचा हलगर्जीपणा अजिबात खपवून घेतला जाणार नाही. कायद्याअंतर्गत कामगारांना सर्व प्रकारच्या सुरक्षा साधनांचा अवलंब करणे गरजेचे आहे. तसेच कार्यस्थळावर अभियंता वर्गाच्या देखरेखीखाली काम होणे आवश्यक आहे. अपघात झाला, तेव्हा अभियंता कुठे होता? यासह विविध बाबी तपासणी गरजेचे आहे, असे महापौर श्रीमती रितू तावडे यांनी सांगितले.बेजबाबदारपणे काम करणाऱ्या विकासक आणि कंत्राटदार यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच अशा घटना भविष्यात होऊ नये यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडा प्राधिकरणाने योग्य ती खबरदारी घ्यावी, असेही निर्देशही महापौर श्रीमती रितू तावडे यांनी दिले आहेत.सदर घटनेत जखमी झालेल्या रुग्णांची विचारपूस करण्यासाठी महापौर श्रीमती रितू तावडे या राजावाडी रुग्णालयात पोहचल्या. तेथे त्या म्हणाल्या की, बांधकामाधीन इमारतीत सातव्या मजल्याचे काम सुरू असताना परांची कोसळून झालेल्या या अपघातात सहा जण खाली कोसळले. त्यापैकी एका मजुराचा दुर्दैवाने मृत्यू झाला आहे. तर अन्य पाच जणांवर बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित राजावाडी रुग्णालय (घाटकोपर) येथे उपचार सुरू आहेत. त्यापैकी एका मजुराची प्रकृती गंभीर असल्याने त्याला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. जखमी सर्व रुग्णांवर आवश्यक ते सर्व वैद्यकीय उपचार करण्याचे निर्देश रुग्णालय प्रशासनाला दिले आहेत, असे महापौरांनी नमूद केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077